क्रमांक ८६६ अॅकब्यु/उपहारगृह/२०१२/
महासंचालक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
वरळी पोलीस कॅम्प, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई – ४०० ०३०.
दिनांक :– ०८ /०२ /२०१२.

**महासंचालक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
**निविदा सूचना**

महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सरपोचखानवाला मार्ग, वरळी पोलीस कॅम्प, वरळी, मुंबई–४०० ०३० (दुरध्वनी क्र. २४९२१२१२/२४९२६८८७) हे अनुभवी आहार व्यवस्था ठेकेदाराकडून महाराष्ट्र पध्दतीचे जेवण, चहा, कॉफी अल्पाउपहाराचे पदार्थ इ. पुरविण्याचे व शासकीय/खाजगी उपहारगृह चालविण्याचा अनुभव आहे. त्यांच्याकडून सिलबंद निविदा दिनांक १५/०२/२०१२ रोजी १७.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. अटी व सुचना http://www.acbmaharashtra.org , http://www.maharashtra.gov.in , http://www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. प्राप्त झालेल्या निविदा दि. १७/०२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वा. उघडण्यात येतील.

सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. महासंचालक यांनी त्यांच्याकडे राखून ठेवला आहे. मा. महासंचालक यांचे संकेत स्थळावर सविस्तर अटी, शर्ती व सूचना पहावयास मिळेल.

( एस.बी. सुर्यवंशी )
अपर पोलीस अधिक्षक (मुख्या.)
महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिता.

प्रत : संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनाय, महाराष्ट्र शासन, नविन प्रशासकीय भवन, १७ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना अग्रेषित.

छायाचित्र

| | |
|---|---|
| व्यवसायाचे नांव :— | ................................................................ |
| व्यवसायाचा पत्ता व | ................................................................ |
| दुरध्वनी क्रमांक. | ................................................................ |
| | ................................................................ |
| | ................................................................ |
| सद्याचा संपूर्ण पत्ता व | ................................................................ |
| दूरध्वनी क्रमांक | ................................................................ |
| . | ................................................................ |
| | ................................................................ |
| मुंबईतील निवासाचा | ................................................................ |
| पत्ता व दुरध्वनी | ................................................................ |
| क्रमांक | ................................................................ |
| कायमचा पत्ता | ................................................................ |
| (गावचा) व | ................................................................ |
| दुरध्वनी क्रमांक | ................................................................ |

खाद्यप्रबंधक
(रबरी शिक्यासह)

## उपहारगृहातील खाद्यपदार्थांचा तपशील व दर निश्चिती :–

| अ. क्र. | खाद्यपदार्थ | पदार्थाचे प्रमाण | दर प्रति रूपये/– |
|---|---|---|---|
| अ | अल्पोपहार | | |
| १ | साधा चहा | १०० एम.एल. | |
| २ | टी बॅग चहा | १०० एम.एल. | |
| ३ | फिल्टर कॉफी | १०० एम.एल. | |
| ४ | नेस कॉफी | १०० एम.एल. | |
| ५ | पोहे–साधे/कांदा | १०० ग्रॅम (सोबत शेव व लिंबू) | |
| ६ | उपमा | १०० ग्रॅम (सोबत शेव व लिंबू) | |
| ७ | शिरा | १०० ग्रॅम | |
| ८ | भजी साधे/मिरची | १०० ग्रॅम ( ७–८ भजींचा समावेश ) | |
| ९ | मिसळ | २०० ग्रॅम व २ पाव | |
| १० | दही वडा | २०० ग्रॅम ( दोन वडे) | |
| ११ | बटाटा वडा | २०० ग्रॅम (दोन वडे)<br>( हिरवी मिरची/ सुकी चटणी ) | |
| १२ | समोसा | २०० ग्रॅम (दोन)<br>( हिरवी मिरची/ सुकी चटणी ) | |
| १३ | मेदू वडा | २०० ग्रॅम (दोन)(चटणी व सांबर) | |
| १४ | इडली | २०० ग्रॅम (दोन) ( चटणी व सांबर ) | |
| १५ | साधा डोसा | २०० ग्रॅम (चटणी व सांबर) | |
| १६ | मसाला डोसा | २०० ग्रॅम भाजी चटणी व सांबर | |
| १७ | उतप्पा साधा/कांदा | २०० ग्रॅम चटणी व सांबर | |
| १८ | ब्रेड बटर | २ ब्रेड स्लाईस ( प्लेन/रोस्टेड) | |
| १९ | ब्रेड जाम | २ ब्रेड स्लाईस ( प्लेन/रोस्टेड) | |
| २० | गुलाब जामुन<br>किंवा जिलेबी | २०० ग्रॅम | |
| २१ | ऑमलेट ब्रेड | २ अंडयाचे ऑमलेट व २ ब्रेड स्लाईस व सॉस | |

| | | | |
|---|---|---|---|
| **ब)** | **दुपारचे जेवण** | | |
| १ | शाकाहारी जेवण | ३ चपाती,<br>१ वाटी वरण,<br>१ वाटी कडधान्याची उसळ,<br>१ वाटी पालेभाजी/फळभाजी,<br>१ वाटी साधा भात,<br>१ वाटी दही/ताक,<br>कांदा, लिंबू, टोमॅटो, काकडी, गाजर, बीट किंवा कोशिंबीर, १ पापड व लोणचं | |
| २ | मासांहारी जेवण चिकन व मटण | ४ चपाती/२ भाकरी<br>२५० ग्रॅम चिकन/मटण,<br>१ वाटी रस्सा,<br>१ वाटी भात,कांदा/लिंबू/काकडी/टोमॅटो/बीट/गाजर. कोशिंबीर किंवा सोलकडी – १ वाटी. | |
| ३ | मासे | ४ चपाती/२ भाकरी,<br>१ वाटी रस्सा, १ प्लेट साधा भात, २५० ग्रॅम १ फिश फ्राय,<br>( सरमई, रावस पॉपलेट) इतर वरीलप्रमाणे. | |
| **ड** | **इतर** | | |
| १ | **बिस्कटस्**<br>पारले जी,<br>गुड डे<br>मारी, क्रॅकजॅक | एम.आर.पी. प्रमाणे | |
| | **शीतपेय**<br>पेप्सी, थमसप,<br>मॅगोला<br>माजा, स्लाईस,<br>सोडा,सेवनअप | एम.आर.पी प्रमाणे ( शीतपेय थंड केल्याबाबतचा इतर चार्ज न लावता ) | |
| २ | मिनरल वॉटर बॉटल्स्<br>मान्यता प्राप्त कंपनीचे<br>(२५० एम.एल., ५००एम.एल व १ लिटर) | एम.आर.पी. प्रमाणे ( शीतपेय थंड केल्याबाबतचा इतर चार्ज न लावता ) | |

# खाद्यपेय प्रबंधकास महत्वाच्या सूचना

१) यशस्वी खाद्यप्रबंधकास १००/— रू मुद्रांकित कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर उपहारगृहाच्या वापरांबंधीचा करारनामा करावा लागेल. सदर करारनाम्यात मुदत, अटी व शर्ती यांचा समावेश असेल व खाद्यप्रबंधकास बंधनकारक राहील.

२) उपहारगृहाकरिता लागणारी स्वयंपाकाची उपकरणे उदा.स्टीलची भांडी, ताटे, वाटया, चमचे, काटे चमचे, ग्लास, कपबशी व प्लेटस् इ.सर्व साहित्य खाद्य प्रबंधकास स्वखर्चाने या कार्यालयाच्या प्रतिनिधीच्या पसंतीनुसार खरेदी करून वापरावयास आणावी लागतील.

३) खाद्यप्रबंधक उपहारगृहाकरिता लागणारे सर्व सज्ञान कर्मचारी स्वत:च्या खर्चाने नेमतील. त्यांचे वेतन मजूरी (किमान वेतन अधिनियमाच्या अधीन राहून) नियामाचे पालन करतील. नेमलेला कर्मचारी अनुभवी, सुशिक्षित व साधारणत: उपहारगृहाकरीता आवश्यक असलेले प्रशिक्षण घेतलेला असावा.

४) उपहारगृहात नेमलेल्या कर्मचाऱ्याचे खाद्यपेय प्रबंधकाचे चारित्र्य तपासणी संबंधीत जिल्हा शहर पोलीस अधिकाऱ्यांकडून करून घेणे बंधनकारक राहील.

५) उपहारगृहात ठेवलेल्या कर्मचाऱ्यांना ओळखपत्रे त्यांच्या छायाचित्रासह पोशाखासह लावणे बंधनकारक राहील व दिलेला पोशाख नेहमी स्वच्छ राहील याची दखल घेणे उपहारगृह चालकास बंधनकारक राहील तसेच सदर समीती करारनाम्यातील अटीचे शर्तीचे तसेच वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे नीट पालन होते किंवा नाही याचीही संबंधीत अधिकारी तपासणी करतील.

६) खाद्य प्रबंधक उपहारगृहात नेमलेल्या अन्न व औषधी व द्रव्य गुण नियंत्रण अधिकारी तसेच महानगरपालीकेचे अधिकृत प्रतिनिधी करतील त्यांच्या गुणवत्तेच्या निकर्षात खाद्यपेय प्रबधंक जबाबदार राहील.

७) खाद्य प्रबंधक उपहारगृहात नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी कर्मचारी इन्शुरन्स ॲक्ट नुसारच रक्कम तसेच कामगार रूग्णालये रक्कम व इतर लागू असलेल्या नियमाचे पालन करणे व परस्पर संबधीत कार्यालयाकडे भरणा करणे बंधनकारक राहील व त्यास खाद्यपेय प्रंबधंक सर्वस्वी जबाबदार राहील व या प्रकरणी मा. महासंचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी जबाबदार राहणार नाही.

८) दर महिन्याची दिलेल्या जागेचे भाडे त्या महिन्याच्या दर ५ तारखेपर्यंत आगाऊ भरणे खाद्य प्रंबधंकास बंधनकारक आहे. ती भाडे जर १ महिन्यापेक्षा थकित राहिल्यास खाद्यपेय प्रबंधकाचा करारनामा रदद् केला जााईल.

९) उपहारगृहाचा भाडे करारनामा हा ११ महिन्यांचा असेल करारनाम्याची मुदत संपल्यानंतर योग्य वाटल्यास खदय प्रबंधकाची इच्छा असल्यास ११ महिन्यांकरीता पुन्हा करारनामा करण्यात येईल असे फक्त दोनदाच ११—११ महिन्याचें करारनामे करण्यात येतील त्यांनतर पुन्हा नविन निविदा मागवून खाद्यपेय प्रंबधंक नेमण्यात येईल.

१०) खाद्य प्रबंधकास उपहारगृह चालविण्यास दिल्यानंतर त्याचा कोणताही भाग व्यवसायासाठी पोट भाडे पध्दतीने देता येणार नाही.

११) भाडे करार संपल्यानंतर सदर जागेचा ताबा शांततेने समितीच्या प्रतिनिधीस कोणतेही करण न दाखविता खाद्य प्रबधंक देतील.

१२) खाद्यपदार्थाचे दर हे प्रत्येकी ५० पैशाच्या (जवळील/पटीत) पूर्णांकाच्या दरात मानण्यात येतील.

१३) उपरोक्त करारनाम्यातील सर्व अटी व सूचना मी/आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत.

१४) उपहारगृहाच्या उपयोगासाठी करारनाम्यामध्ये नमूद केलेल्या जागेकरिता मी/आम्ही भरपाई म्हणून दरमहा रू. ३८,५८६/— भाडे शासनास भरण्यास तयार आहोत.

१५) खादयपेय प्रबंधकास उपहारगृहाकरिता मासिक भाडे भरपाईपोटी ठेव रक्कम म्हणून रू ५०,०००/—अनामत रक्कम भरण्यास तयार आहे. (कार्यालयाच्या नांव एफ.डी.आर. करावा लागेल.)

१६) उपहारगृहात नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वेतन व मंजूर किमान वेतन नियमाच्या अधीन राहुन नियमाचे पालन करीन.

——००——

# ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील उपहारगृहासाठी पुरवठा सेवेसंबधीच्या करारनाम्यातील शर्ती व अटी.

अ) खाद्य प्रबंधकास उपहारगृहाकरीता वापरण्यास सदरहू इमारतीच्या भागाच्या विस्तार किंवा त्यातील फेरबदल नियंत्रण अधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही. सदरील अटीचा भंग झाल्यास नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार खाद्यपेय प्रबंधक दंडास पात्र राहील.

ब) खाद्य प्रबंधकाने दिलेल्या जागे व्यतिरिक्त इतर कोणतीही अतिरिक्त जागा नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या पूर्व संमती शिवाय वापरू नये अतिरिक्त जागा तात्पुरत्या स्वरूपात हवी असल्यास नियंत्रण अधिकारी यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतरच निर्देशित अटी व शर्ती वर देण्यात येईल.

क) नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार खाद्य प्रबंधकास उपहारगृहाकरीता वापरावयास दिलेल्या जागेवर/भागावर शासनाच्या मालमत्तेसंबधी खाद्य प्रबंधक कोणताही मालकी हक्क किंवा अधिकार निर्माण करणार नाही किवा त्यावर कोणताही मालकी हक्क मागणार नाही. तसेच उपहारगृहाकरिता वापरावयास दिलेल्या जागेत ठेवल्या गेलेल्या खाद्यपेय प्रबंधकाच्या मालमत्तेची नुकसान भरपाई पासुन सुरक्षिततेची जबाबदारी खाद्यपेय प्रबंधकाची राहील. त्यास नियंत्रण अधिकारी जबाबदार राहणार नाही.

ड) नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार उपहारगृहाच्या जागेचा अनधिकृत वापर उदा.अनधिकृत भागीदारी करणे, पोटभाडेकरू ठेवणे किंवा व्यवसायाचा कोणताही भाग पोट भाग भाडयाने देणे इत्यादी गंभीर बाबी आढळल्यास सदर जागेचा ताबा पूर्व सुचना देऊन तात्काळ ताब्यात घेतला जाईल व त्याबदद्ल शासनाची झालेली नुकसान भरपाई ही अनामत रक्कमेतून वसूल केली जाईल.

इ) उपहारगृसाठी दिलेल्या जाागेचे भाडे नियंत्रण अधिकारी यांनी अंतिम केलेल्या मासिक भरपाईच्या दराप्रमाणे ५ तारखेपर्यंत आगाऊ भरणा नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधीच्या कार्यालयात रोखीने भरावी लागेल. १ महिन्याच्यावर मासिक भरपाईची रक्कम थकीत राहील्यास नियंत्रण अधिकारी सदर करारनामा रदद् करू शकतील. थकबाकी वसूल करण्याकरिता नियंत्रण अधिकारी हे वसूलीबाबत इतर कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यास मुक्त राहतील.

फ) खाद्य प्रबंधकास दरमहा भरपाईपोटी नियंत्रण अधिकारी यांनी केलेल्या रकमेच्या दुप्पट इतकी ( रू. ८०,०००/– ) किंवा त्यापेक्षा जास्त अनामत रक्कम कार्यालयाकडे करारनामा करून घेण्याच्या पूर्वी भरावी लागेल व ती करारनामा संपुष्टात आल्यानंतर तीन महिन्यांनी परत केली जाईल.

क) खाद्य प्रंबधकास उपहारगृह चालविण्यासाठी दिलेल्या जागेत प्रबंधकाने कोणतीही मोडतोड केल्यास किंवा त्याच्यामुळे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाइसार्ठी नियंत्रण अधिकारी यांनी यांचे दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

ख) खाद्य प्रबंधकास व्यवसायाकरीता उपहारगृहाची दिलेली कोणतीही जागा उप–व्यवसायासाठी ( उदा. पान सुपारी, सिगारेट, भेलपूरी, इ.) पोट भाडयाने देता येणार नाही. असे आढळून आल्यास नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार करारनामा संपुष्टात आणण्या इतपत कार्यवाही करण्यात येईल.

२) **फर्निचर सुविधा :**

अ) फर्निचर सोबत जोडलेल्या विरणपत्राप्रमाणे ॲन्ट करप्शन ब्युरो कार्यालयाच्या उपहारगृहाकरीता शासनातर्फे पुरविलेल्या फर्निचरची दुरूस्ती व निगराणी ही प्रबंधकास पुरवावी लागेल यात जाणूनबुजून तोडमोड झाल्यास प्रबंधकास स्वखर्चान दुरूस्ती करावी लागेल.

ब) किचन ओटयाची आवश्यक उभारणी शासनामार्फत केलेली आहे. तसेच दोन गॅस सिलेंडर अे.सी.बी. कार्यालयाने खरेदी केलेले असून भरलेले दोन्ही गॅस कॅटींन सुरू करताना आपणास देण्यात येतील मात्र कॅटींन सुरू केल्यानंतर प्रत्येक महिन्यात गॅस सिलींडर्सकरीता येंणारा खर्च प्रबंधकानी करावयाचा आहे.

क) फ्रिज, डिफ्रिजर, किचन रेन्ज, विद्युत शेगडया, गॅसच्या शेगडया, हॉटप्लेट, हॉटप्लेट केसेस इत्यादी खाद्यपेय गरम किंवा थंड स्थितीत राहाण्यासाठी लागणारे सर्व साहित्य पुरेशा प्रमाणात खाद्यपेय प्रबंधकास वापरण्याकरिता स्वखर्चाने आणवी लागतील.

३) **कर्मचारी**

**खाद्य प्रंबधकाने नेमावयाच्या कर्मचारी वर्गासाठी अटी.**

**अ)** खाद्यपेय प्रबंधकास उपहारगृह चालवण्यासाठी आवश्यक असलेले सर्व कर्मचारी स्वखर्चाने नेमावे लागतील हे सर्व कर्मचारी १८ वर्षावरील व अनुभवी व निरोगी असावेत.

**ब)** खाद्यपेय प्रबंधकानी नेमलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची पूर्व चारित्र्य तपासणी नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिकारी वर्गामार्फत आवश्यक वाटल्यास पोलीस खात्याकडून करवून घेणे खाद्यपेय प्रबंधकास बंधनकारक राहील. याकरिता त्यांनी नेमणूक केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची यादी संपूर्ण नांव व टपाली पत्यासह उपहारगृह चालू केल्यानंतर १५ दिवसांच्या आत नियंत्रण अधिकारी यांचेकडे सादर करावी.

**क)** खाद्यपेय प्रबंधकाने उपहारगृहात नेमलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची वैद्यकिय तपासणी दर सहा महिन्याने शासकीय अधिकाऱ्याकंडून करवून घ्यावी व वैद्यकिय अधिकाऱ्यांनी दिलेले तपासणी प्रमाणपत्र नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावे लागेल. वैद्यकिय तपासणीत एखादा कर्मचारी अपात्र ठरल्यास त्यास उपहारगृह प्रबंधकाने सेवामुक्त करणे सक्तीचे आहे. अपात्र कर्मचाऱ्यांना सेवामुक्त न केल्यास उपहारगृह प्रबंधक नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार कार्यवाहीस पात्र राहील.

**ड)** उपहारगृहाकरीता नेमलेल्या कर्मचारी वर्गाकरीता नियंत्रण अधिकारी यांनी मान्य केलेल्या गणवेश सतत नीट नेटका व स्वच्छ राहील याकडे खाद्यपेय प्रबंधकाने लक्ष पुरविणे सक्तीचे आहे तसे न आढळल्यास वा तशी लेखी तक्रार झाल्यास व ती तपासणी अंती खरी आढळून आल्सस नियंत्रण अधिकारी यांनी निर्देशित केलेल्या कलम क्रमाक ९ (क) प्रमाणे कार्यवाहीस पात्र  राहील.

**फ)** उपहारगृहात नेमलेल्या कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधी, कामगार कल्याण रूग्नालय निधी, कामगार इन्शुरन्स फंड व व्यवसाय कर इ. त्याच्या विभागाचे संबधित खाात्याकडे परस्पर भरणा करणे खाद्यपेय प्रबंधकास बंधनकारक राहील. या प्रकरणी मा. महासंचालक जबाबदार राहणार नाही. सदरील कर्मचाऱ्यांचा वेतनपट नियंत्रण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेला अधिकारी वर्ग आवश्यकतेनुसार कधीही तपासू शकतील यावरील म नियंत्रण अधिकारी यांनी घेतलेला अंतिम निर्णय प्रबंधकावर बंधनकाराक राहील.

खाद्यपेय प्रबंधकाने उपहारगृहात नेमलेला स्वत:चा कर्मचारी सर्व याचे वेतनातुन नियमानुसार कपात केलेले भविष्य निर्वाह निधी व व्यवसाय कर, जीवन विमा, कामगार रूग्नालय निधी इत्यादींचा भरणा किमान वेतन अधिनियमानुसार संबधित खात्याकडे खाद्यप्रबंधकाने परस्पर भरणे सक्तीचे असल्याने म नियंत्रण अधिकारी जबाबदार राहणार नाहीत

**३)** खाद्यपेय प्रबंधकास उपहारगृहाकरीता नेमलेल्या कर्मचारी वर्गाना ओळखपत्र देण्याकरीता त्यांच्या छायाचित्रासह त्यांचे नांव नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिकारी वर्गाकडे सादर करावी लागतील अशी ओळखपत्रे सदर उपहारगृहाचा ताबा घेतल्यापासून १५ दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक राहील. कर्मचारी वर्गाचे ओळखपत्र कर्मचाऱ्या कधीही मागीतल्यास सादर करावे लागेल. ओळखपत्र कर्मचाऱ्यांनी शर्टला छातीच्या भागावर नियीमत लावणे व हे पहाणे खाद्यपेय प्रबंधकास बंधनकारक राहील.

४) **<u>खाद्यपेय पदार्थाबाबत सुचना :</u>**

खाद्यपेय तयार करण्याच्या संबंधात नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार उपहारगृह प्रबंधकाने खलीलप्रमाणे काटेकोरपणे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

१) तांदुळ, ज्वारी, गहू, बाजरी, धान्यडाळी व कडधान्ये उत्कृष्ट व चांगल्या प्रतीची असावीत.

२) चांगल्या व प्रसिध्द कंपनीने तयार केलेल्या वनस्पती तुपाचा व परिकृत शेंगदाण्याच्या तेलाचाच वापर काटेकोरपणे करावा. एगमार्कने मान्य केलेल्या वस्तू वापरण्यात याव्यात.

३) भाज्या व खाद्यपदार्थ तयार करताना परिकृत शेंगदाण्याच्या ताज्या तेलाचा वापर करावा.

४) मांसाहरी व शाकाहरी पदार्थासाठी प्रत्येक प्रकारास योग्य प्रकारचा वेगवेगळा मसाला वापरावा. मसाला उत्तम प्रतीचा असावा. त्यात लवंग, वेलदोडे, दालचिनी, मिरे, उचे शहाजिरे इत्यादीचा योग्य प्रमाणात वापर व उत्तम स्वाद असावा.

५) पालेभाजी, मेथीची भाजी, चवळी, मटकी, शेवग्याच्या शेंगा, गवार, भेंडी, वांगी, बटाटे, टोमॅटो व तत्सम भाज्या व पदार्थाचा दररोजच्या जेवनासाठी अधूनमधून बदल करून वापर करावा. सर्व भोजन व उपहाराचा पदार्थ, मसाले व जेवण महाराष्ट्रीयन पध्दतीचे असावेत. पदार्थ तयार करणारा स्वयपांकी महाराष्ट्रीयन असावा.

६) खाद्यपेयाचा दर फलक स्पष्ट व मोठया अक्षरात दिसतील अशा ठिकाणी भोजन गृहात लावण्यात यावा. मेनूकार्ड स्पष्ट व मोठया अक्षरात छापील तक्त्यात प्लास्टीक कव्हरमध्ये प्रत्येक टेबलावर ठेवावे. कराची आकारणी खाद्यपेय प्रबंधकास करता येणार नाही.

७) खाद्यपेय प्रबंधकास नियंत्रण अधिकारी यांनी उपहारगृहाच्या खाद्यपेय सुधारणेसाठी वेळोवेळी केलेल्या सुचनाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी लागेल.

८) उपहारगृहातील अन्नपदार्थ सामुग्रीची नियंत्रण अधिकारी किंवा त्यांचे नियुक्त प्रतिनिधी अधून मधून अचानकपणे तपासणी करतील आणि जर असे आढळून आले की, पुरविलेले अन्नपदार्थ हे मानवी वापरासाठी निकृष्ट

किंवा अयोग्य असतील तर मा. महासंचालक यांनी ठरविलेल्या कार्यवाहीस किंवा दंडास तसेच कंत्राट समाप्ती करीता पात्र राहतील.

९) खाद्यपेय पदार्थाच्या व्यवस्थेबाबतीत नियंत्रण अधिकारी यांचे समाधान न झाल्यास किंवा या कराराच्या कोणत्याही उपरोक्त अटीपैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास खाद्यपेय प्रबंधकास एक लेखी सूचना पाठवण्यात येईल व या सूचनेच्या तारखेपासून एक महिन्यानंतर किंवा पर्यायी व्यवस्था होईपर्यंत नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार कंत्राट संपुष्टात आणण्यात येईल. खाद्य व्यवसाय सोडून देण्याची खाद्यपेय प्रबंधकाची इच्छा असल्यास अगर आपला खाद्यपेय व्यवस्था व्यवसाय बंद करावयाच्या असल्यास अशा अशायाची तीन महीने आधी लेखी सूचना नियंत्रण अधिकारी यांना देणे खाद्यपेय प्रबंधकावर बधनकारक राहील. खाद्यपेय व्यवस्था बंद करणे किंवा अस्थापना त्या जागेवरून दुसरीकडे हलविता येणार नाही. सदर बाबीचे उल्लंघन केल्यास मा. महासंचालक यांच्या निर्देशानुसार खाद्यपेय प्रबंधक कार्यवाहीस पात्र राहतील.

१०) उपहारगृहातील खाद्यपेय देण्याची वेळ खालीप्रमाणे प्रबंधकाने ठेवणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १) सकाळचा चहा/कॉफी व नाश्ता | ८.३० ते १२.०० |
| २) दुपारचे जेवण | १.०० ते ०३.३० |
| ३) सायंकाळचा चहा/कॉफी व नाश्ता | ३.३० ते ०८.३० |

११) सकाळच्या न्याहारीत पोहे, चिवडा, भजी, मिसळ, तिखट व गोड शिरा, उपमा, बटाटा वडा, ब्रेड बटर, मसाला डोसा, दही वडा, मेंदु वडा, इडली, ऑमलेट, समोसा इत्यादी पदार्थ पुरवावेत. न्याहारी त्या त्या दिवशी जे पदार्थ तयार असतील त्यांची फलकावर यादी लावावी.

१२) वेगळया कंपनीमार्फत पुरविण्यात येणारे सौम्य पेय व शितपेय परिशिस्ट अ मध्ये त्या त्या कंपनीने पेयात इरिटेटेड वॉटर व मान्यता प्राप्त कंपन्याची पेये यांचा समावेश असेल.

५) **स्वच्छता :**

१) खाद्यपेय प्रबंधकास उपहारगृह चालविण्याकरीता दिलेल्या जागेत अन्नपदार्थ, घटक द्रव्य व स्वयंपाक घराची सर्व जागा धुवून–पुसून स्वच्छ ठेवावी लागेल. नियंत्रण अधिकारी किंवा त्यांने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीनी नैमत्तिक केलेल्या तपासणीच्या व वेळोवेळी दिलेल्या सूचनेच्या अधीन हे उपहारगृह राहील.

२) खाद्यपेय प्रबंधकाने उपहारगृहाची जागा दिवसातुन दोन वेळा फिनाईलने धुवून स्वच्छ करणे आवश्यक आहे. तसेच प्रसाधनगृहे व हात धुन्याची जागा इत्यादी स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. उपहारगृहातील स्वच्छतेबाबत कोणतीही तक्रार येता कामा नये. याबाबत योग्य ती दक्षता उपहारगृह प्रबंधकानी घ्यावी.

३) उपहारगृहातील स्वयंपागृहात व साठवण करण्याच्या जागेत कोणत्याही प्रकारच्या किटकाचा उंदराचा व पालीचा उपद्रव होणार नाही याची काळजी घेतली जावी. त्याकरीता महिन्यातुन एकदा किंवा दोनदा किटक नाशके द्रव्य खाद्यपेय प्रबंधकाने उपहारगृहात स्वखर्चाने मारून घेणे बंधनकारक राहील.

६) **<u>साठवण :</u>**

१) खाद्यपेय प्रबंधक सर्व अन्नधान्याचे पदार्थ त्यांनी केलेल्या अभिलेख कक्षात व्यवस्थितपणे साठवून ठेवणे आवश्यक आहे. तेल तुपाचे पदार्थ हे स्वंतत्रपणे ठेवावे लागतील. अन्नधान्य, तेल–तुप या पदार्थशेजारी किंवा त्याखाली कोणतेही ज्वालाग्राही पदार्थ साठवू नये. रॉकेल व तत्सम ज्वलनशील द्रव्ये याचा साठा करू नये.

२) मांसाहरी पदार्थ उदा.मांस, अंडी व मासे इ. शितकपाटात ठेवून सुरक्षिततेची खाद्यप्रबंधकांनी काळजी घ्यावी.

७) **<u>तपासणी :</u>**

१) नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी उपहारगृहातील व्यवस्थेची व खाद्यपदार्थाची तसेच उपहारगृहाकरीता आवश्यक असलेल्या अन्नधान्य व वस्तूंची अधून मधून तपासणी करतील व त्यांची गुणवत्ता ठरवतील. खाद्यपदार्थाचा दर्जा, त्यांची साफसफाई, साठवण केलेल्या अन्नधान्याचा, तेल तुपाचा दर्जा, निकृष्ट वाटल्यास मा. महासंचालक व नियुक्त प्रतिनिधी यांने तो नाकारण्याचा पूर्ण अधिकार राहिल. नियंत्रण अधिकारी यांनी निर्देशित केलेल्या कार्यवाहीस खााद्यपेय प्रबंधक पात्र राहील.

२) अन्न व औषधी द्रव्य, गुण नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत वापरात असलेल्या पदार्थाची खाद्यपेय प्रबंधकास बंधनकारक राहील. गुणवतेच्या तपासणीचा सर्व खर्च खाद्यपेय प्रबंधकाकडे राहील. तसेच महाराष्ट्र फ्रिव्हेशनर व अडल्टरेशन नियम १९६२ चे प्रचलित नियम खाद्यप्रबंधकास बंधनकारक राहील. अन्न व औषध प्रशासन विभाग यांचे कडील आवश्यक परवाना प्रंबधकाची जबाबदारी व बंधनकारक राहील.

३) उपहागृहाच्या श्रेणी पदार्थाचा दर्जा व स्वच्छता चांगली राहण्याच्या दृष्टीने नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार अधुन मधुन महानगरपालिका स्वास्थ विभागाचे निरीक्षक तपासणी करतील व त्याचे निष्कर्ष उपहागृह प्रबंधकार बंधनकारक राहतील.

८) **<u>दंडात्मक योजना :</u>**

अ) उपहारगृहातील खाद्यपेय पदार्थाच्या सेवनामुळे उपभोक्त्याच्या स्वास्थात अन्न व विषबाधा इत्यादी सारखे गंभीर बिघाड निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी खाद्यपेय प्रबंधकाची राहील. याबाबतची कोणतीही जाबाबदारी नियंत्रण अधिकारी तसेच त्यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनधिधींची असणार नाही.

ब) नैसर्गिक आपत्ती वगळता खाद्यपेय प्रबंधकानी खाद्यपेय पुरवठा कोणत्याही करणास्तव बंद केल्यास नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार खाद्यपेय प्रबंधक दरदिवशी रू.५००/– प्रति दिन दंडास पात्र राहील. महानगरपालिका स्वास्थ्य विभागाचे निरीक्षक तपासणी करतील व त्याचे निष्कर्ष उपहागृह प्रबंधकावर राहील.

९) **<u>सर्वसाधारण शर्ती व अटी :</u>**

१) निविदा मध्ये अंतर्भूत असलेले खाद्यपदार्थ यांचा पुरेसा ताजा व गरम साठा असावा.

२) खाद्यपेय प्रबंधकाचे कर्मचारी वर्गानी कोणतीही बक्षिसी इत्यादी मागू नये.

४) खाद्यपेय प्रबंधकाना खालील नमुद केलेल्या नोंदवहया उपहागृहातील काऊंटरवर ठेवणे बंधनकारक राहील.

५) खाद्यप्रबंधकानी वरीलप्रमाणे दाखविलेल्या तक्रारीची अंमलबजावणी केली पाहिजे. त्यातील मासिक उतारे व तक्रारीचे निवारण करण्यांत आलेली उपाययोजना विषद करून नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधीकडे खाद्यपेय प्रबंधकाने सादर करणे बंधनकारक राहील.

६) या करारनाम्या अंतर्गत असलेल्या शर्ती व अटी संबधात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याबाबचा अंतिम निर्णय हा नियंत्रण अधिकारी देतील व तो खाद्यपेय प्रबंधकावर बंधनकारक राहील.

७) जर खाद्यपेय प्रबंधकास उपहागृह भागिदारी मध्ये चालवावयाचे असेल तर तसा पंजीबध्द भागीदार करारनामा निविदेसोबत प्रमाणित प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

८) विशेष बाब :— जे खाद्यपदार्थ करारनाम्यात समाविष्ट नाहीत अशा खाद्य पदार्थाची मागणी केल्यास खाद्यपेय प्रबंधकाने असा पदार्थ माफक दरात उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

## १०) <u>कालमर्यादा</u> :—

कालमर्यादा मुदत नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार प्रथमतः ११ महिन्यासाठी तसेच खाद्यपेय प्रबंधकाचे काम समाधानकारक आहे. असे वाटल्यास नियंत्रण अधिकारी यांना पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ देण्याचा अधिकार राहील. परंतू सुरवातीला ११ महिन्याचा कालावधी हा परीक्षण, निरीक्षण कालावधी म्हणून राहील. ११ महिन्यानंतर करारनाम्याचा कालावधी वाढवून देण्याचा अधिकार मा. महासंचालक यांनी करारनाम्यात अंतर्भूत असलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन समाधानकारकरित्या होत असल्यास राखून ठेवण्यांत आला आहे. सदर करारनामा हा फक्त दोन वेळाच ११—११ महिन्याच्या कालावधीकरीता वाढविण्यात येईल त्यानंतर पुन्हा नव्याने निविदा प्रक्रिया मागवून नविन खाद्यपेय प्रबंधकाची नेमणूक करण्यात येईल. करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास प्रबंधकाला एक महिन्याची पूर्व सूचना देवून एक महिन्याची मुदत संपल्यानंतर कोणताही करारनामा संपूष्टात आणण्याचा व उपहारगृहाची जागा ताब्यात घेण्याचा अधिकार मा. महासंचालक यांना राहील. यापोटी कोणतीही भरपाई मागण्यात खाद्यपेय प्रबंधक पात्र राहणार नाही.

## ११) <u>कॅन्टींग करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या एकुण जागेचे क्षेत्रफळ.</u>

ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई येथील इमारतीत तळ मजल्यावर उपहारगृह असून त्याचे एकुण ( ५० x २४ = १२०० चौ. फुट क्षेत्रफळ ) आहे. सदर उपहारगृहासाठीचे भाडे शासन सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १६.१०.२००३ नुसार २००३ ला रू. १५/— प्रति चौ.फुट व पुढील प्रत्येक वर्षाला १० टक्के जास्तीचे करून सन २०११ ला रू. ३२.१५ प्रति चौ. फुट प्रमाणे रू. ३८,५८०/— आहेत.

## १२) शासकीय फर्निचर यादी :— ( उपहारगृह )

| | |
|---|---|
| १) खुर्च्या | ५० नग |
| २) डायनिंग टेबल | १० डायनिंग टेबल |
| ३) गॅस सिलिंडर | २ नग |
| ४) वाटर कुलर | १ नग |
| ५) वाटर प्युरीफायर | १ नग |